**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये निदेश** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना त्यांच्या शहरांसाठी स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan-LAP) तयार करण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दतीच्या मसुद्यास (Standard Operating Procedure -SOP) मान्यता मिळणेबाबत निदेश.

**आदेश**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२५/१७६/प्र.क्र.३३/२०२५/नवि-१३,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

चौथा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक ०४.०४.२०२५**

**प्रस्तावना —**

१. शासनाच्या मा. मुख्यमंत्री पुरस्कृत 100 दिवसांत प्राधान्याने पूर्ण करावयाच्या बाबींमध्ये स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plans -LAP) तयार करण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दतीचा (Standard Operating Procedure -SOP) मसूदा तयार करणे व वाहतूक केंद्रीत विकास क्षेत्रासाठी आराखडा तयार करणेसाठी शहरी वाहतूक निधी वापरण्याकरिता प्रशासकीय मान्यता मिळणे या बाबी समाविष्ट आहेत.

२. शहरांची वाढती लोकसंख्या आणि वेगाने होणारे नागरीकरण, त्यामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना उपाययोजना शोधण्यासाठी walk to work ही संकल्पना, वाहतूक केंद्रित विकास (Transit Oriented Development), station area development इत्यादी संकल्पना यांचा नगर नियोजनात समावेश करण्याची नितांत आवश्यकता आहे.

३. या सर्व बाबी स्थानिक क्षेत्र योजनांच्या माध्यमातून करता येणे शक्य आहे. तसेच, केंद्र शासनाकडून भांडवली गुंतवणुकी साठी राज्यांना विशेष अनुदान प्राप्त होते. त्याकरिता केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यांनी एकंदर सहा Urban Reforms करणे गरजेचे आहे. त्यात स्थानिक क्षेत्र योजना (LAP) यांचा समावेश असून, एक लक्ष व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी स्थानिक क्षेत्र योजना तयार करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

४. उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने, स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या शहरांसाठी स्थानिक क्षेत्र योजना (LAP) तयार करण्यासाठी तसेच त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना निदेश पारित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये प्राप्त अधिकारात शासन नियोजन प्राधिकरणांना खालीलप्रमाणे निदेश देत आहे.

## शासन निदेश

I) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना त्यांच्या शहरांसाठी स्थानिक क्षेत्र योजना (Local Area Plan-LAP) तयार करण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दतीचे (Standard Operating Procedure -SOP) मसुद्यास **(परिशिष्ट — अ)** नुसार शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

II) सदर प्रमाणित कार्यपद्धती मार्गदर्शिकेनुसार (SOP) स्थानिक स्वराज्य संस्थांनी तात्काळ कार्यवाही सुरू करावयाची आहे.

III) सदर प्रमाणित कार्यपद्धती मार्गदर्शिकेमध्ये (SOP) कालानुरुप तसेच सुलभतेच्या दृष्टीने यथोचित बदल करण्याचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

IV) सदरचे निदेश तात्काळ लागू होतील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.*

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

**(डॉ.प्रतिभा भदाणे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी -**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

२) आयुक्त, सर्व महानगरपालिका. (बृहनमुंबई महानगरपालिका वगळता)

३) विभागीय आयुक्त, पुणे / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर/कोकण/अमरावती विभाग.

४) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

५) विभागीय सहसंचालक, नगर रचना. नगर रचना कोकण/ छत्रपती संभाजीनगर/ पुणे/नाशिक/ नागपूर विभाग.

६) सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना, पुणे / नाशिक / कोकण / नागपूर / छत्रपती संभाजीनगर / अमरावती विभाग

७) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

८) सर्व नवनगर विकास प्राधिकरणे.

९) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ४१६.

१०) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

११) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचा शासन निदेश महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रामध्ये राज्यस्तरावर प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभागास संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना आणि वरील सर्व कार्यालयांना पाठवाव्यात.

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

१३) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये.

१४) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

१५) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सोबतचा शासन निर्णय या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

१६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

१७) निवड नस्ती (नवि-१३)

-------------